# शेवटच्या लाभार्थ्याला लाभ मिळेपर्यंत 'शासन आपल्या दारी' अभियान सुरु राहील !

**पुणे / प्रतिनिधी**

'शासन आपल्या दारी' या उपक्रमाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत शासकीय योजना पोहचविण्यासाठी शासन व प्रशासन प्रयत्नशील असून शेवटच्या नागरिकाला विविध योजनांचा लाभ मिळेपर्यंत हे अभियान सुरू राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील 'शासन आपल्या दारी' उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते शासकीय योजना व विविध सेवांच्या लाभाचे प्रातिनिधीक स्वरुपात वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, महेश लांडगे, अश्विनी जगताप, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्त राहुल महिवाल, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, 'शासन आपल्या दारी' अभियानाच्या माध्यमातून प्रशासकीय यंत्रणा गतीमान करण्यात आली आहे. १ एप्रिलपासून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. पुणे जिल्ह्यात २ लाख ८६ हजार २७८ लाभार्थ्यांना लाभाचे वाटप करण्यात आले. आतापर्यंत राज्यात ३५ लाख नागरिकांपर्यंत शासन पोहोचले आहे. १०४ शिबिराच्या माध्यमातून २८६ कोटी रुपयांचा लाभ नागरिकांना देण्यात आला आहे. या अभियानामुळे कोणीही लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही.

**मंत्रिमंडळाच्या माध्यमातून अनेक जनहिताचे निर्णय**

मंत्रीमंडळाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. शेतकरी, कष्टकरी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग बांधव, महिला भगिनींसाठी महत्वाचे निर्णय घेतले. ज्येष्ठ नागरिकांसाठी एसटी प्रवास मोफत व महिलांसाठी प्रवास शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. शासनाच्या निर्णयांचा सर्वसामान्य जनतेला लाभ होत आहे.

'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेनुसार राज्य शासनही ६ हजार रुपये भर घालणार येणार असल्याने १२ हजार इतका वार्षिक लाभ पात्र शेतकरी कुटुंबांना मिळणार आहे. राज्यातील १८ हजार कोटी रुपयांच्या २९ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली, त्यामुळे ६ ते ७ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून एनडीआरएफच्या निकषांच्या दुप्पट निधी देण्याचा आणि सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीची भरपाई देता यावी यासाठी १ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**पिंपरी चिंचवड परिसर विकासासाठी महत्वाचे निर्णय**

पिंपरी चिंचवड विकासासाठी अनेक निर्णय घेतले. २०१८ ते २०२३ पर्यंतचे विकास आणि बांधकामाचे अतिरिक्त विकास शुल्क १०० टक्के माफ करण्याचा निर्णय. एप्रिल २०२३ पासून क्षेत्रनिहाय तपासून आकारणीचा निर्णय घेण्यात आला आहे. मोशी येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासाठी अडीच एकर जागा देण्याचा निर्णय घेतला आहे. पिंपरी चिंचवड हद्दीतील अनधिकृत बांधकामासाठीचा ४६० कोटी रुपयांचा शास्तीकर माफ करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरणाच्या भूसंपादनामुळे बाधित झालेल्या भूमिपूत्रांचा प्रश्न सोडविण्यात येईल, असेही ते म्हणाले.

**जिल्ह्याच्या विकासाला गती**

पालखी मार्ग आणि पुणे-मिरज रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. चांदणी चौकातील कामही पूर्ण होत आहे. जेजुरी तीर्थक्षेत्र विकास आणि वढू बुद्रुक येथे संभाजी महाराज स्मारक काम लवकरच सुरू करण्यात येईल. यशवंतराव चव्हाण स्मारकासाठी ५ कोटी रुपये देण्यात येतील. पुण्यातील नद्यांमधील पाणी निर्मळ राहावे यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून जलशुद्धीकरणासाठी निधी देण्यात आला आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**महिला सक्षमीकरणासाठी महत्वाची पाऊले**

'लेक लाडकी लखपती' ही योजना महिला व मुलींच्या विकासासाठी सुरु करण्यात आली आहे. महिलांना सक्षम करण्यासाठी महिला बचत गटाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे. प्रशासनाने बचत गटाच्या उत्पादनांना बाजार उपलब्ध करून देण्याचा आणि फिरता निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात येईल. राज्यात २ कोटी पेक्षा अधिक महिलांना शासनाच्या योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न आहे. संजय गांधी निराधार योजनेसाठी उत्पन्नाच्या दाखल्याची मुदत ५ वर्ष करण्यात येईल, असेही श्री.शिंदे यांनी सांगितले.



**राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना**

लोकांचे जीवन सुखी, आनंदी करणे आणि त्यांच्या आयुष्यात अनुकूल बदल घडवून आणणे हे शासनाचे उद्दीष्ट आहे. म्हणूनच सर्वासामान्य जनतेला केंद्रस्थानी घेवून त्यांच्या हिताचे निर्णय घेण्यात येत आहेत. राज्यात पायाभूत सुविधांचे अनेक मोठे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र प्रथम स्थानावर असून गेल्या सुमारे ११ महिन्यात १ लाख १८ हजार कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आणल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

खासदार श्री.बारणे म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शासनातर्फे जनतेच्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न होत आहेत. नागरिकांना शासन आपल्या दारी अभियानांतर्गत एकाच ठिकाणी विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहेत.

आमदार श्रीमती जगताप यांनीही यावेळी विचार व्यक्त केले. चिंचवड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात संजय गांधी निराधार योजनेत चांगले काम झाल्याचे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात

### चोरट्याने चक्क PMP बस पळवली

**पुणे :** बसमध्ये चावी असल्याचे पाहून चोरट्याने पीएमपी बस पळवून नेली आणि मार्केट यार्ड परिसरात बस सोडून चोरटा पसार झाला. याबाबत पीएमपीच्या स्वारगेट आगारातील सुरक्षा अधिकारी सुरेश सोनवणे यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### शिरुर शहरात चारचाकीतून महिलेचे दागिने लांबवले

**शिरुर :** शिरुर शहरात पायी चाललेल्या जेष्ठ दाम्पत्याला चारचाकी गाडीतून लिफ्ट देण्याचा बहाणा करुन ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबवल्याची घटना घडली असल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे अज्ञात इसमांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

शिरुर शहरातून यमुनाबाई गायकवाड व कचरू गायकवाड हे दोघे पायी तहसील कार्यालय कडे चाललेले असताना पाठीमागून दोन युवक एका कार मधून आले होते त्यांनी कचरू गायकवाड यांना बाबा कोठे चालले चला आम्ही सोडतो असे म्हणून कार मध्ये बसवले काही वेळाने दोघांना तहसील कार्यालय येथे सोडले दरम्यान गळ्यातील मंगळसूत्र नसल्याचे यमुनाबाई यांच्या निदर्शनास आलेत्यामुळे कार मधून आलेल्या युवकांनी आपल्या गळ्यातील मंगळसूत्र चोरल्याची खात्री झाल्याने याबाबत यमुनाबाई कचरू गायकवाड वय ६५ वर्षे रा. कैकाडी आळी शिरुर ता. शिरुर जि. पुणे यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने शिरुर पोलिसांनी अज्ञात इसमांवर गुन्हे दाखल केले असून पुढील तपास पोलीस निरीक्षक सुरेशकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक श्रीपाद जगताप हे करत आहे.

## पाईपलाईन दुरुस्तीच्या कामामुळे आळंदीकरांना उशिराने होणार पाणीपुरवठा

**आळंदी / प्रतिनिधी**

**आळंदी शहरास पाणीपुरवठा करणारी पुणे महानगरपालिकेची १७०० एमएम पाईपलाईन लिकेज झाली. यामुळे गुरुवारी आळंदी शहरात पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. या दरम्यान सदर पाईपलाईन लिकेज काढण्याचे काम सुरू करण्यात आले.**

आळंदी शहरास पाणीपुरवठा करणारी पुणे महानगरपालिकेची १७०० एमएम पाईपलाईन लिकेज झाली. यामुळे गुरुवारी आळंदी शहरात पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. या दरम्यान सदर पाईपलाईन लिकेज काढण्याचे काम सुरू करण्यात आले. परंतु, हे काम मोठ्या स्वरूपात असल्यामुळे या कामास विलंब होणार असून पाणीपुरवठा उशिरा होणार आहे.

लिकेजचे काम दुपारी ३ पर्यंत पूर्ण होण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. शिवाय काम पूर्ण झाल्यानंतर कुरळी येथील केंद्रावर पाणी पोहोचण्यास सुमारे ४ तास कालावधी लागणार आहे. त्यानंतर आळंदी येथे पाणी पोहोचण्यास सुमारे अर्धा तास कालावधी लागेल.

वरील शक्यतेनुसार काम सुरळीत पार पडल्यास आळंदी शहरात भामा आसखेड वरून पाणी येण्यास साधारणतः सायंकाळी साडे सात ते आठ वाजण्याची शक्यता आहे. त्यानंतर नियमाप्रमाणे गावठाणचे टप्पे सुरू करण्यात येणार असून सदर कामामुळे उशिरा पाणी पुरवठा होत असल्याची माहिती आळंदी नगरपरिषद पाणीपुरवठा विभाग प्रमुख शीतल जाधव यांनी दिली.

## महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात संसंदीय लोकशाही प्रणालीचा पाया घातला !

**पुणे :** महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकातच 'अनुभवमंटप' च्या माध्यमातून संसदीय लोकशाही प्रणालीचा पाया घातला. जातीभेदाच्या भिंती तोडून टाकण्यासाठी त्यांनी स्वत:पासून सुरुवात केली, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केले.

निगडी येथे उभारण्यात आलेल्या महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, महेश लांडगे, अश्विनी जगताप, अण्णा बनसोडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह,पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्त राहुल महिवाल, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, बसवेश्वरांनी समाजाप्रती आस्था, बांधिलकी दाखवून दिली. इंग्लंडमधील मॅग्नाकार्टा या संसदीय प्रणालीच्या आधीच त्यांनी 'अनुभव मंटप'च्या माध्यमातून लोकशाही प्रणालीची व्यवस्था निर्माण केली. स्त्री-पुरुष, धर्म, जात- पात, पंथ भेदाच्या पलिकडे जाऊन कोणीही 'अनुभवमंटप' मध्ये आपले अनुभव मांडू शकत होते. श्रम हीच पूजा आणि श्रमाधारित व्यवस्था इतके साधे सोपे तत्त्वज्ञान महात्मा बसवेश्वरांनी सरळ सोप्या भाषेत मांडले. देवाशी म्हणजे शिवाशी जोडण्यासाठी मध्यस्थाची गरज नाही अशी मांडणी त्यांनी केली. त्यांच्या तत्वज्ञानाची जगभरातील विद्यापीठांनी दखल घेतली. महात्मा बसवेश्वर यांनी खऱ्या अर्थाने समता, बंधुता या तत्त्वांचा पुरस्कार केला. महापुरुषांचे समाजासाठी योगदान मोठे आहे. त्यांच्या विचारांवर चालत सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम आपण करत असतो. महात्मा बसवेश्वरांनी समता, बंधुतेच्या तत्त्वांसाठी कोणतीही तडजोड केली नाही. महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा हे प्रेरणास्थळ, उर्जास्थळ आहे. महात्मा बसवेश्वरांचा लंडन येथेही पुतळा उभारण्यात आला आहे. हे महापुरुष आपल्याला आदर्श देऊन गेले आहेत. निगडी येथील हा पुतळा लोकवर्गणी लोकसहभागातून केला याला जास्त महत्त्व आहे. त्यांचा त्याग, आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आपण हे मोठे काम केले आहे, असे श्री.शिंदे म्हणाले.

## चक्क कंपनीची गोपनीय माहिती प्रतिस्पर्धी कंपनीला विकली; कंपनीचे करोडोचे नुकसान

**महाळुंगे / प्रतिनिधी**

कंपनीत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी कंपनीतील गोपनीय माहिती प्रतिस्पर्धी कंपनीला विकून कंपनीचे सुमारे ३० कोटींचे नुकसान केले. याप्रकरणी कंपनीचे असिस्टंट मॅनेजर, प्रोडक्शन मॅनेजर आणि डेप्युटी मॅनेजर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार सन १९९६ पासून सन २०२३ या कालावधीत कुरुळी येथील कल्याणी मॅक्सिवॉन व्हील्स प्राइवेट लिमिटेड या कंपनीमध्ये घडला.

याप्रकरणी नरेंद्र अर्जुनराव पाटील (वय ५७) यांनी महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार असिस्टंट मॅनेजर सचिन छबीनदास सुरवडे, ऑपरेशन प्रोडक्शन मॅनेजर अरुण हनुमंत चिखले, डेप्युटी मॅनेजर संजीव अण्णाप्पा निंगनुरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हे फिर्यादी यांच्या कंपनीत काम करत असताना त्यांच्याकडे विश्वासाने सोपविलेल्या कंपनीच्या व्यवसाय संदर्भातील गोपनीय माहितीचा त्यांनी अपहार केला. त्या माहितीचा वापर परस्पर स्वतःच्या मेल आयडीवर पाठवून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी केला.

ही माहिती आरोपींनी फिर्यादी यांची प्रतिस्पर्धी असलेल्या स्टील स्ट्रिप्स व्हील्स लिमिटेड चेन्नई या कंपनीला विकला. यामुळे फिर्यादी यांच्या कंपनीचे साधारणतः ३० कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. महाळुंगे पोलीस तपास करीत आहेत.

## पिस्टल बाळगल्या प्रकरणी दोघांना अटक

**हिंजवडी / प्रतिनिधी**



बेकायदेशीरपणे पिस्टल बाळगल्या प्रकरणी हिंजवडी पोलिसांनी दोघांना अटक केली. ही कारवाई रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास हिंजवडी जवळ माणगाव येथे करण्यात आली.

ऋषिकेश सुभाष ओझरकर (वय २५, रा. ओझरकरवाडी, माण, ता. मुळशी), रोशन दशरथ तेलंगे (वय २१, रा. ओझरकरवाडी, ता. मुळशी. मळ रा. यवतमाळ) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अंमलदार अरुण नरळे यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माणगाव येथील बस स्टॉप जवळ (कळपक्षुरवळ) दोघेजण संशयित रित्या थांबले असल्याची माहिती हिंजवडी पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावून दोघांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे ७० हजार रुपये किमतीचे गावठी बनावटीचे दोन लोखंडी पिस्टल आढळून आले. पोलिसांनी पिस्टल जप्त करत दोघांना अटक केली. हिंजवडी पोलीस तपास करीत आहेत.

## शिक्रापुरात नराधम बापाकडूनच मुलीचा विनयभंग

**शिक्रापूर / प्रतिनिधी**

शिक्रापूर ता. शिरुर येथे बापाकडूनच अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला जात असल्याची धक्कादायक घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे नराधम बापावर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

शिक्रापूर ता. शिरुर येथील अल्पवयीन युवती महाविद्यालयीन शिक्षण घेत असून मुलगी घरात झोपलेली असताना पहाटेच्या सुमारास तिची आई स्वयंपाक करत असताना तिचा बाप तिच्या शेजारी येऊन अश्लील चाळे करु लागला त्यावेळी मुलीने घडलेला प्रकार तिच्या आईला सांगितला, त्यांनतर काही दिवसांनी पुन्हा नराधमाने मुलीशी अश्लील चाळे करण्याचा प्रयत्न केला, नंतर सदर मुलगी शिक्षणासाठी गेलेली असताना तिच्या बापाने सदर महाविद्यालय संस्थेत फोन करुन मुलीच्या आईला काहीतरी झाले आहे तुम्ही तिला घरी पाठवा असे सांगितले, मात्र यावेळी सदर प्रकाराबाबत मुलीला शंका आल्याने तिने सदर खोटा असून आईशी माझे बोलणे झालेले आहे असे सांगत घडलेला प्रकार तिच्या ओळखीच्या सामाजिक कार्यकर्त्या महिलेला सांगितला, दरम्यान सदर सामाजिक कार्यकर्त्या महिलेशी चर्चा करत मुलीने शिक्रापूर पोलीस स्टेशन गाठत याबाबत तक्रार दिल्याने शिक्रापूर पोलिसांनी सदर नराधम बापाच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रमोद क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन अतकरे हे करत आहे.

# चाकण एमआयडीसीमधील वीजपुरवठ्याचे प्रश्न प्राधान्याने सोडविणार; महावितरणकडून ग्वाही

**चाकण :** एमआयडीसीमधील औद्योगिक ग्राहकांना आणखी दर्जेदार व सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणकडून वीजयंत्रणेचे सक्षमीकरण व विस्तारीकरणाचे कामे वेगाने सुरू आहेत. उद्योगांचे वीजप्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्य देण्यात येत असून ग्राहकसेवेत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. तसेच औद्योगिक ग्राहक प्रतिनिधींसमवेत सातत्याने संवाद साधून विविध प्रश्न निकाली काढण्यात येईल, अशी ग्वाही पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी दिली. चाकण एमआयडीसीमध्ये महावितरण व फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीज यांची संयुक्त बैठक झाली. यावेळी मुख्य अभियंता पवार बोलत होते. अधीक्षक अभियंता युवराज जरग, कार्यकारी अभियंता राजेंद्र एडके, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे अध्यक्ष. दिलीप बटवाल, पदाधिकारी विनोद जैन, अनिल बजाज तसेच औद्योगिक ग्राहकांच्या ६५ प्रतिनिधींची यावेळी उपस्थिती होती. या बैठकीमध्ये मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी ग्राहक प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, 'एसएसएमआर' योजना व दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजनेतून २ नवीन स्विचिंग स्टेशन, १४२ रिंगमेन युनिट, २८ किलोमीटर उच्चदाब वीजवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. तसेच विद्युत यंत्रणा सुधारणा योजनेअंतर्गत चाकण एमआयडीसीमध्ये १५ कोटी ४९ लाख रुपये खर्चाच्या कामांना सुरवात झाली आहे. यामध्ये तीन नवीन स्विचिंग स्टेशन्स, एका स्विचिंग स्टेशनची क्षमतावाढ, ३५ किलोमीटर नवीन भूमिगत वाहिन्या, ज्या वीजवाहिन्या अतिभारित आहे त्यांचे विभाजन करून नवीन वीजवाहिन्या टाकणे, सहा नवीन रिंग मेन युनिट आदींचे कामे सुरु आहेत. या बैठकीमध्ये विविध उद्योगांचे संचालक व प्रतिनिधींनी वीजविषयक स्थानिक प्रश्न व अपेक्षांची माहिती दिली. त्यानुसार पवार यांनी संबंधीत वीज प्रश्नांचे ताबडतोब निवारण करण्यासाठी स्थानिक अभियंत्यांना सूचना देत तांत्रिक उपाययोजनांची माहिती दिली. या कार्यक्रमाला महावितरणचे उपकार्यकारी अभियंता विजय गारगोटे, सहायक अभियंता रामप्रसाद नरवाडे तसेच चेतन पाटील, अनिल भोसले, अभिजित देव, संतोष हांडे, लोकेश जैन आदींसह विविध कंपन्यांचे ग्राहक प्रतिनिधी उपस्थित होते.


**एल&टी फायनान्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

**गहाण मालमत्तेच्या विक्रीचा जाहीर लिलाव**

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचा अधिकृत अधिकारी प्रतिभूतीकरण आणि वित्तीय मत्तांची पुनर्बांधणी आणि प्रतिभूती स्वारस्याची अंमलबजावणी कायदा, 2002 (54 वर्ष 2002) अन्वये आणि सदर कायद्यान्वये प्राप्त शक्तींचा वापर करत पुढील मालमत्तेचा **'जिथे आहे तिथे तत्त्वावर'** आणि **'जे आहे ते'** परिस्थितीत **'जाहीर ई-लिलावाच्या'** माध्यमातून देय रकमा आणि त्यांवरील व्याज, शुल्के आणि खर्च इ. वसुल करण्यासाठी ई-लिलाव करत आहे.

| कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 14.06.2023 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. प्रशांत उत्तेकर 2. अनुराग हरिश्चंद्र उत्तेकर | मालमत्तेचा पत्ता – फ्लॅट क्र. 104 अधिमापन सुमारे 59.98 चौ.मी. चटई क्षेत्रफळ सोबत 7.43 चौ.मी. जोडलेल्या बाल्कनीचे क्षेत्रफळ सोबत 11.73 चौ.मी. संलग्न त्याच मजल्यावरील गच्चीचे क्षेत्रफळ सोबत 2.69 चौ.मी. पहिल्या मजल्यावरील ड्राय बाल्कनीचे क्षेत्रफळ, इमारत क्र. डी, सोबत एक आच्छादित पार्किंगची जागा वापरण्याचा एकाधिकार, ''मेट्रो जॅझ'' नावाच्या प्रकल्पामधील बांधकाम, सर्वेक्षण क्र. 12/1 अधिमापन 02 हे 3.33 आर म्हणजेच 20333 चौ.मी. एकूण जमिनीचे अधिमापन 03 हे 04 आर, गाव महालुंगे, जि. पुणे, महाराष्ट्र 411045 आणि पुढीलप्रमाणे सीमाबद्ध : | H01295301220075355 & H012953012200L75355 | 28 एप्रिल 2023 | रु. 5,71,252/- | रु. 1,12,76,522.43/- | रु. 57,12,520/- | 12/07/2023 | 19/07/2023 |

| सीमारेषा | | |
|---|---|---|
| | पूर्व | लिफ्ट आणि 3 बीएचके |
| | पश्चिम | प्रकल्पाची सीमा |
| | उत्तर | इमारत 'बी' |
| | दक्षिण | 2 बीएचके फ्लॅट |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. जाहीर ई-लिलाव उपरोक्त दिनांक व वेळेरोजी पार पाडण्यात येईल, व सदर वेळी उपरोक्त प्रतिभूत मत्तांची **'जिथे आहे तिथे' तत्त्वावर आणि 'जे आहे ते'** तत्त्वावर विक्री केली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **17/07/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **19/07/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **20/07/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात **ज्याचे नाव : शेखर काळे, संपर्क क्र. 9823271111, एल अँड टी फायनान्स लि. – ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098 आणि अंकित विग, संपर्क क्र. 8668943242, एल अँड टी फायनान्स लि, ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 17.06.2023
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड


**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com